## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३६/२०२३ मधील निशाणी क्र. १९ वरील आदेश

१) प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (यापुढे अधिनियम असा संक्षिप्त उल्लेख करण्यात येत आहे) चे कलम २३ अन्वये तिच्याकरीता दरमहा रु. ३०,०००/– प्रमाणे व दोन मुली नामे तेजस्वी, वय ८ वर्षे व वैदेही, वय ६ वर्षे यांच्याकरीता प्रत्येकी दरमहा रु. २०,०००/– प्रमाणे अंतरीम पोटगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२) अर्जदार हीने उपरोक्त अधिनियमाचे कलम १२ अन्वये दाखल केलेल्या मूळ अर्जामध्ये तिने विविध प्रकारच्या मागण्या केल्या असून सद्यस्थितीत तो अर्ज पुराव्याकरीता प्रलंबित आहे. सदर अर्जामध्ये तिचे थोडक्यात कथन असे आहे की, तिचे सामनेवाला क्र. १ याच्याशी दि. ०८/०२/२०१४ रोजी यावली ता. मोहोळ येथे लग्न झाले असून लग्नाच्या वेळी तिच्या वडीलांनी सामनेवाला क्र. १ यास १५ तोळे सोने दिले होते. तसेच, लग्नासाठी दहा ते बारा लाख रुपये खर्च केला होता. सामनेवाला क्र. २ ही तिची सासू असून सामनेवाला क्र. ३ व ४ हे दिर आहेत. लग्नानंतर ती सासरी नांदण्यास गेली असता सुरुवातीचे चार पाच दिवस तिला चांगणी वागणूक मिळाली. त्यानंतर मात्र टीव्ही, वॉशिंग मशिन, चारचाकी गाडी व इतर साहित्य खरेदीसाठी तिने माहेरुन पाच लाख रुपये आणावे म्हणून सामनेवाला तिचा छळ करु लागले. ती परीस्थीतीत बदल होईल या आशेने सदर त्रास सहन करत होती. दरम्यान तिला तेजस्वी – वय ८ वर्षे व वैदेही – वय ६ वर्षे या दोन मूली झाल्या आहेत. त्यानंतर सामनेवाला क्र. १ हा त्याला मुलगा हवा होता असे म्हणून दारु पिऊन तिला नेहमी मारहाण करु लागला. दि. १५/०७/२०२२ रोजी सामनेवाला यांनी तिला शिवीगाळ व मारहाण करुन घराबाहेर हाकलले आहे. तेव्हापासून ती आईवडीलांकडे राहत आहे. सामनेवाला क्र. १ याचे एका स्त्रीशी अनैतिक संबंध आहेत. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सामनेवाला क्र. १ हा संगणक अभियंता असून पुणे येथील कंपनीत नोकरीस आहे. त्याला दरमहा तीन लाख रुपये पगार मिळतो. तसेच, त्याचे बदलापूर, पनवेल, ठाणे व मुंबई याठिकाणी एकूण आठ फ्लॅट असून त्यापैकी सहा फ्लॅट भाडयाने दिले आहेत. त्यातून त्यास दरमहा रु. ६०,०००/– भाडे मिळते. तसेच, सांगली जिल्हयात त्याची दोन एकर शेती असून त्यातून दरवर्षी चार लाख रुपये उत्पन्न मिळते. सबब सामनेवाला क्र. १ याने तिला दरमहा एक लाख रुपये पोटगी, घर घेण्यासाठी ४० ते ४५ लाख रुपये, नुकसान भरपाई म्हणून दहा लाख रुपये व हार्नियाच्या शस्त्रक्रियेकरीता तीन लाख रुपये द्यावेत अशी तिची मूळ अर्जात विनंती आहे.

३) सामनेवाला यांनी मूळ अर्जास म्हणणे (नि.क्र.१२) दाखल करुन विरोध केला आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदाराशी असलेले नातेसंबंध व सामनेवाला क्र. १ यास अर्जदारापासून दोन मूली झाल्याचे मान्य केले आहे. मात्र, सामनेवाला क्र. २ ते ४ हे अर्जदारासोबत कधीही राहीले नसल्याचे त्यांचे कथन आहे. तसेच, सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराचा कधीही कसलाही छळ केला नसल्याचे त्यांचे कथन आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदार हिनेच सामनेवाला क्र. १ याचा वेळोवेळी छळ केला आहे. तसेच, अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ वर दबाव टाकण्यासाठी आत्महत्येचा देखील प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे अर्जदार ही घरी स्वयंपाक बनवत नसे. तसेच, अर्जदार हिचे एका व्यक्तीशी अनैतिक संबंध असून ते सामनेवाला क्र. १ च्या लॅपटॉपवर रेकॉर्डींग झालेले आहे. अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ याचा विश्वासघात केला आहे. त्यामूळे, अर्जदार ही सामनेवाला क्र. १ कडून पोटगी मिळण्यास पात्र नाही. केवळ सामनेवाला यांच्यावर दबाव टाकून त्यांच्याकडून रक्कम उकळता यावी म्हणून प्रस्तुत अर्ज दाखल केला असल्याचे त्यांचे कथन आहे. तसेच, सद्यस्थितीत सामनेवाला क्र. १ याची नोकरी गेली असल्याने त्याच्याकडे उत्पन्नाचे साधन नसल्याचे तसेच त्यास मधुमेहाचा आजार असल्याचे त्यांचे कथन आहे. सबब मूळ अर्ज नामंजूर करावा अशी त्यांची विनंती आहे.

४) सध्या मूळ अर्जात अर्जदाराने सरतपासाचे शपथपत्र दाखल केले असून त्यावेळी तिने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन तिने मूळ अर्जाचा गुणवत्तेवर निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार असल्याने व तिच्याकडे तिच्या व दोन्ही मुलींच्या पालनपोष्णाचे साधन नसल्याने अंतरीम पोटगी मिळावी अशी विनंती केली आहे.

५) त्याचप्रमाणे, अर्जदाराने अर्ज नि.क्र. २१ अन्वये दाखल करुन तिच्या दोन्ही मुलींना औरंगाबाद येथील पोतदार शाळेत शिकायला ठेवल्याचे नमूद करुन सदर शाळेच्या दोन्ही मुलींच्या सन २०२३–२४ व २०२४–२५ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्क व बसभाडयाच्या पावत्या तसेच तिच्यावर झालेल्या उपचाराकामी दवाखान्यात दिलेल्या बिलाच्या पावत्या दाखल करुन अर्जदार हिने रक्कम रु. २,४७,४७०/– सामनेवाला क्र. १ कडून मिळावी अशी विनंती केलेली होती. सदरचा अर्ज दि. १७/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झालेला आहे.

६) सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्ज तसेच अर्ज नि.क्र. २१ ला म्हणणे (नि.क्र.२५) दाखल करुन विरोध केला असून अर्जदारावर कुठलीही शस्त्रक्रिया झाली नसल्याचे तसेच दोन्ही मूली कुठल्याही शाळेत शिकत नसल्याचे त्यांचे कथन आहे. त्याचप्रमाणे, सामनेवाला क्र. १ याच्यावर अर्जदाराने भादवि कलम ४९८–अ प्रमाणे गुन्हा दाखल केला असल्याने त्यास नोकरी

मिळत नसल्याचे तसेच अर्जदार ही सध्या संभाजीनगर येथे नोकरी करुन दरमहा दोन लाख रुपये उत्पन्न मिळवत असल्याने ती स्वतःचे व दोन्ही मुलींचे पालनपोषण करु शकत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. सबब, प्रस्तुत अर्ज रद्द व्हावा अशी त्यांची विनंती आहे.

७) उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. तसेच, अर्जदार व सामनेवाला यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे व मालमत्ता व दायित्व बाबतची शपथपत्रे यांचे अवलोकन केले.

८) उभयपक्षांच्या कथनावरुन उपस्थित झालेली बाब व त्यावरील माझा निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करीत आहे –

| अ. क्र. | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही स्वतःकरीता व दोन्ही मुलींकरीता अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय. अर्जदार हिच्याकरीता दरमहा रु. ७०००/– प्रमाणे व दोन्ही मुलींकरीता प्रत्येकी दरमहा रु. ५०००/– प्रमाणे. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**विचारार्थ बाब क्र. १ व २ करीता –**

९) एकमेकाशी असलेले नातेसंबंध उभय पक्षांना मान्य आहेत. तसेच, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांना एक आठ वर्षाची व एक सहा वर्षाची मुलगी असल्याचे उभय पक्षांना मान्य आहे. दि. १५/०७/२०२२ पासून अर्जदार ही दोन्ही मुलींसोबत सामनेवाला क्र. १ याच्यापासून विभक्त राहत असल्याचे उभय पक्षांना मान्य आहे.

१०) एकंदरीत, उभय पक्षांचे संपूर्ण कथन पाहता अर्जदार ही सामनेवाला क्र. १ वर अनेक गंभीर आरोप करते. त्यातील काही आरोप त्याच्या चारीत्र्याशी निगडीत आहेत. तसेच, सामनेवाला क्र. १ हा सुध्दा अर्जदारावर अनेक गंभीर आरोप करतो. त्यातील काही आरोप तिच्या चारीत्र्याशी निगडीत आहेत. सद्यस्थितीत या आरोपांबाबतचा सविस्तर उल्लेख करणे

न्यायोचित दिसून येत नाही. त्याचप्रमाणे उभय पक्षांनी सदर आरोपाच्या समर्थनात दाखल केलेल्या विविध कागदपत्रांचा सद्यस्थितीत उल्लेख करणे आवश्यक दिसून येत नाही.

**११)** एकंदरीत, उभय पक्षांनी एकमेकांविरुध्द केलेले गंभीर आरोप पाहता उभय पक्षांना त्यांचे म्हणणे पुराव्यानिशी सिध्द करण्यास संधी देणे आवश्यक दिसून येते. निश्चीतच प्रकरणाचा गुणवत्तेवर निर्णय देण्यास बराच अवधी लागणार आहे. उभय पक्षकार एकमेकांवर गंभीर आरोप करत असले तरी आजरोजी त्यांच्यातील नातेसंबंध अस्तीत्वात असल्याचे उभय पक्षांना मान्य आहे. तसेच सन २०१४ पासून सन २०२२ पर्यंत अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ याच्याशी संसार केला असताना ती स्वतःहून निघून गेल्याचे सामनेवालाचे कथन सद्यस्थितीत संयुक्तीक दिसून येत नाही. त्यामूळे सामनेवाला क्र. १ ने अर्जदारास घराबाहेर काढून कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

**१२)** निश्चीतच अर्जदार व तिच्या दोन्ही मुली यांच्या पालनपोषणाची तसेच मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी सामनेवाला क्र. १ यांचेवर आहे. सामनेवाला क्र. १ हा जरी सद्या अर्जदार नोकरी करत असल्याचे कथन करत असला तरी त्याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. तसेच, ती त्याच्यासोबत रहात असताना नोकरी करत असल्याचे त्याचे कथन नाही. त्यामूळे, सद्या अर्जदाराने नोकरी करुन उदरनिर्वाह करावा असे म्हणून तो तिच्या पालनपोषणाची जबाबदारी झटकू शकत नाही. एकंदरीत, सामनेवाला हा जरी त्याची नोकरी गेल्याचे नमूद करत असला तरी त्याने बरीच वर्षे संगणक अभियंता म्हणून नोकरी केल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या वतीने दाखल करण्यात आलेले सामनेवाला क्र. १ चे पगारपत्रक पाहता त्यास दरमहा रुपये दीड लाखापेक्षा अधिक पगार असल्याचे दिसून येते. तसेच, त्याच्याकडे बरेच प्लॅट असून त्याचे भाडे त्याला मिळत असल्याचे दिसून येते. सामनेवाला याने त्याचे बँकेचा मागील तीन वर्षांचा खातेउतारा दाखल केलेला नाही. त्यामूळे, त्याचे पूर्वीचे उत्पन्न पाहता तो निश्चितच अर्जदार व दोन्ही मुलींच्या पालनपोषणाचा खर्च करु शकतो. सदरचा खर्च देणे त्याच्यावर बंधनकारक आहे. त्यामूळे अर्जदार ही स्वतःकरीता व तिच्या मुलींकरीता सामनेवाला क्र. १ याच्याकडून अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र असल्याच्या निष्कर्षास मी आलो आहे.

**१३)** यापूर्वी या न्यायालयाने अर्ज नि.क्र. २१ वर आदेश पारीत करुन अर्जदाराच्या दवाखान्याच्या खर्चापोटी तसेच दोन्ही मुलींच्या सन २०२३–२४ व २०२४–२५ या वर्षाच्या शैक्षणिक खर्चापोटी र.रु.२,४७,४७०/– मंजूर केलेली आहे. त्याचवेळी सामनेवाला क्र. १ हा सध्या सुशिक्षीत बेकार असल्याचे नमूद करतो. तसेच अर्जदार ही सध्या यावली ता. मोहोळ येथे

माहेरी राहत असल्याचे तिचे कथन आहे. या बाबी पाहता अर्जदार व तिच्या दोन्ही मुलींना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी व निवासासाठी म्हणून अर्जदार हिस दरमहा सात हजार प्रमाणे व तिच्या दोन्ही मुलींना दरमहा प्रत्येकी रुपये पाच हजार प्रमाणे अंतरीम पोटगी मंजूर केल्यास त्यातून त्यांचे पालनपोषण होऊ शकेल असे दिसून येते. तसेच सदर पोटगीमुळे सामनेवाला क्र. १ याच्यावरसुध्दा अधिकचा आर्थिक ताण पडणार नाही. त्यामूळे, विचारार्थ बाब क्र. १ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवून अर्जदार ही स्वतःकरीता दरमहा रु. सात हजार प्रमाणे व दोन्ही मुलींकरीता प्रत्येकी दरमहा रु. पाच हजार प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासून अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र असल्याचा निष्कर्ष नोंदवित आहे. तसेच विचारार्थ बाब क्र. २ च्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## <u>आ दे श</u>

१. अर्ज नि.क्र. १९ अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिस प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून मूळ प्रकरणी गुणवत्तेवर न्यायनिर्णय होईपावेतो तिच्या स्वतःकरीता दरमहा रु. ७,०००/– (रुपये सात हजार फक्त) प्रमाणे व दोन्ही मुलींकरीता प्रत्येकी दरमहा रु. ५,०००/– (रुपये पाच हजार फक्त) प्रमाणे अंतरीम पोटगी द्यावी असे आदेशित करण्यात येते.

३. या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना तसेच संबंधीत पोलीस ठाण्याचे अधिकारी यांना मोफत देण्यात यावी.

४. खर्चाबाबत तुर्तास कुठलाही आदेश नाही.

PRAKASH GANPATRAO MAHALANKAR

Digitally signed by PRAKASH GANPATRAO MAHALANKAR
Date: 2025.02.27 18:05:31 +0530

**(प्र. ग. महाळंकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. २, मोहोळ.

दिनांक – २७/०२/२०२५.

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V. A. Dange |
| Court | : | J.M.F.C., Court No. 2, Mohol |
| Date | : | 27/02/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 27/02/2025 |
| Order Uploaded on | : | 28/02/2025 |